**आर सी सी क्र.४२/२०२३**
**नि.**

**तक्रारदारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १**
मी सत्य प्रतिज्ञेवर सांगतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | - हरिकिसन बाळासाहेब केदार |
| वय | - २२ वर्षे |
| कामधंदा | - शेती आणि उसतोड |
| राहणार | - **प्रभु वाडगाव, ता. शेवगाव** |

तक्रारदाराचे दोषारोप निश्चीतीपूर्वीचा पुरावा तक्रारदारतर्फे विधीज्ञ श्री आर के गरुड यांच्यामार्फत शपथेवर सुरु

१. माझे वडिल श्री बाळासाहेब विक्रम केदार यांनी पावर टॅक इरो ५० हा टॅक्टर खरेदी केला होता. हा टॅक्टर त्यांनी कुकाणा सचिन ऑटोमोटीव मधून विकत घेतला होता. त्यांनी दि. ६.१०.२०१७ रोजी १५०००/७ रोख देउन टॅक्टर विकत घेतला होता. त्यानंतर १०.१०.२०१७ रोजी ३०,०००/- व दि.३०.१०.२०१७ रोजी २५,०००/- टॅक्टरच्या शोरुममध्ये भरले होते. अर्जुन सदाशिव फूंदे आमचे जवळचे नातेवाईक असल्यामूळे ते आम्हाला म्हणाले की तुमचा टॅक्टर उस तोडीला लावा. सन २०१८ मध्ये फॅब टेक शुगर लि. मध्ये उसतोडी वाहतूकीसाठी आमचा टॅक्टर अर्जुन फूंदे यांनी लावला होता. उसतोडीचे काम पूर्ण झाल्यानंतर ते म्हणाले की तुमच्या इथे टॅक्टरचे काही कामे नसतील, टॅक्टर माझ्यापाशी ठेवा, मी टॅक्टरचे सर्व हप्ते भरतो. त्यानंतर त्यांनी कोणताही हप्ता भरला नाही. त्यानंतर हप्ते भरण्यासाठी मी त्यांच्याकडे गेलो असता त्यांनी कोरोना काळाचे कारण देउन हप्ते भरले नाही तसेच टॅक्टरही ताब्यात दिले नाही. त्यानंतर मी त्यांच्याकडे टॅक्टर कामाचे पैसे मागितले. त्यानंतर ते म्हणाले की टॅक्टर कामाचे पैसे देणार नाही, टॅक्टर घेउन जा. त्यानंतर मी टॅक्टर घेउन येउन टॅक्टरचे मशीन काम केले व उपजीविका भागवण्यास सुरुवात केली. ही बाब त्यांना पटली नाही म्हणून त्यांनी मला धमकी दिली की तुझा टॅक्टर आणून घाल नाहीतर टॅक्टर चोरी करुन विहीरीत घालीन. असे असताना दि.९.९.२०२२ रोजी मी चापडगाव येथे आलो असता अर्जुन फूंदे यांनी माझा टॅक्टर आडवून मला खाली ओढून गचांडी देउन शिवीगाळ करुन टॅक्टर चालू करुन घेउन गेले. त्यानंतर मी पोलीसांकउे गेलो. त्यांनी माझी तक्रार घेतली नाही. त्यानंतर मी आरपीएडी ने अर्ज केला होता. परंतु त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. मी न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारी अर्जावर माझी सही आहे. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री. एल एच लांडे यांच्यामार्फत

२. माझी जन्म तारीख दि.७.८.२००२ आहे. आज रोजी माझे वय २२ आहे. हे म्हणणे खरे आहे की सन २०१७ साली मी १६ वर्षाचा होतो. हे म्हणणे खरे नाही की मी अज्ञान असल्यामूळे मला या

घटनेविषयी काही माहिती नाही. माझे शिक्षण इयत्ता १० पर्यंत झाले आहे. मी इयत्ता १० वीत सन २०१८-१९ मध्ये होतो. मी इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत प्रभूवाडगाव फाटयावरील शाळेमध्ये शिकत होतो. हे म्हणणे खरे आहे की मी इयत्ता १० पर्यंत शाळेत रेगुलर शाळेत जाणारा विद्यार्थी होतो. माझ्या वडिलांचे वय ४०/४५ आहे. माझे वडिल शरीराने धडधाकट आहेत. माझ्या वडिलांना टॅक्टर सारखे वाहन चालवता येते. हे म्हणणे खरे आहे की टॅक्टरचा व्यवहार माझ्या विडिलांनी केला होता. हे म्हणणे खरे आहे की जी काही घटना झाली ती माझ्या वडिलांबाबत झाली होती. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादमधील घटना माझ्या वडिलांसोबत झाली होती. माझे वडिल आज रोजी हयात आहेत.

प्रश्न तुमचे वडिल हयात असताना आणि घटना झाली त्यावेळी तुमचे वय १६ वर्ष असताना तुम्हाला फिर्याद देण्याचा अधिकार कोणी दिला ?

उत्तर माझे वडिल मेंटल झाले आहेत म्हणून फिर्याद मीच देणार ना, आमच्या बाबतीत अन्याय झाला आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की सदर घटनेची फिर्याद देण्याचा मला आजीबात अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे वडिल मेंटल झाल्याबाबत मी आज रोजी न्यायालयात पहिल्यांदाच सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या वेळी काय झाले हे फक्त माझ्या वडिलांनाच माहिती आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतात की मी त्यावेळी माझ्या वडिलांसोबत होतो. हे म्हणणे खरे आहे की सन २०१७ पासून आजपर्यंत माझ्या वडिलांनी या आरोपीविरुध्द कोठेही तक्रार केलेली नाही.

प्रश्न तुमच्या वडिलांनी आरोपीविरुध्द का तक्रार केली नाही ?

उत्तर माझे वडिल मेंटल झाले. माझे वडिल सन २०१९ पासून मेंटल झाले आहेत.

४. हे म्हणणे खरे आहे की माझे वडिल मेंटल होण्यापूर्वी त्यांनी आरोपीविरुध्द तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की शोरुममध्ये टॅक्टरचे पैसे घेण्यादेण्याचा व्यवहार मी स्वतः माझ्या हाताने केला नव्हता.

<u>उर्वरित उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञांच्या तोंडी विनंतीनुसार पुढच्या तारखेपर्यंत तहकूब</u>

श्रवणोत्तर स्वीकृत

**sd/-**

दि. १२.०३.२०२४

(श्रीमती एस यू जागुष्टे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
शेवगाव